
कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 240 /२०२६ दि. 26/११/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक २९/११/२०२६ रोजी सायंकाळी १७:०० वा. डॉ श्रीकांत शिंदे फांऊडेशन वतीने ह.भ.प सावळाराम महाराज क्रिडा संकुल, मैदान डोंबिवली पुर्व येथे **"खासदार क्रिडासंग्राम २०२६"** सांगता सोहळा संपन्न होणार आहे. त्याकरीता मा.श्री मनसुख मांडविय, केंद्रिय खेल मंत्री, भारत सरकार, मा. श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच इतर मान्यवर (व्ही.आय.पी) तसेच खेळाडू व नागरीक मोठया संख्येन उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडुन घरडा सर्कल (छत्रपती शिवाजी महाराज चौक) कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बंदीश पॅलेश हॉटेल येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही बंदीश पॅलेश हॉटेल येथून सावित्रीफुले नाटयगृह रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दिनांक २९/११/२०२६ रोजी सायंकाळी १७:०० वा. ते रात्रौ २२.०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.